# APPENDIX-III

## SOME DHANGARI OVYAS

### १) पुण्यश्लोक देवी श्रीमंत अहिल्याबाई होळकर

- ओवीकार य.ल. कारंडे

सुंबरान मांडीलं । सुंबरान मांडीलं ।। ध्रु ।।
सुंबरान कुणाचं । जाती बहिणा अहिल्याचं ।
सुंबरान मांडीलं । सुंबरान मांडीलं ।
सुंबरान कुणाचं । मल्हार बाबा राजाचं ।
पुण्यापासून बाजूला । वीस कोस पल्याला ।
निरा नदी काठाला । होळ गांव गांवाला ।
होळ त्याहो गावाला । खंडुजी इरकर राहण्याला ।
होळ गांवी राहीला । होळकर नांवा पावला ।
होळकर त्याहो घराण्याला । सतराशे त्यान्नव सालाला ।
पुत्र आला वंशाला । मल्हारी नांव त्याला ।
तिन वर्षं लेकाला । भरता पूर्णं क्यला ।
खंडेराव मुक्ला । पंचभूत मोक्षाला ।
खंडेरावन्या राणीला । भीती वाटली जीवाला ।
जिवाई त्या राणीन । पुत्र आपला घेवून ।
तळोदे त्या सासरी । जिवाई नि मल्हारी ।
बंधू जवळ जावून । भोजा पाशी राहून ।
काम करू लागली । दिस कंटू लागली ।
पुढे काय दिवसान । भोज राजा मावळ्यान ।
मेंढ्या दिल्या घेवून । भावा केला कारण ।

मल्हारी त्या भाग्यान । नित नेमा प्रमाण ।
मेंढ्या रोज राखून । जगत आपली सोडून ।
पुढे आठ वर्षांनी । मेंढ्या राना घेवुंनी ।
वरत्या राना जावुंनी । रानामध्ये फिरून ।
दुपार झाली म्हणून । थक्वा आला जाणून ।
गार सावली पाहून । बाळ झोपला दाबून ।
जगदिशाचे कृपेने । परमेशाचे लिलेने ।
वारुळाचे आतून । शेषा नाग येवून ।
बाळा जवळ जावूंन । फणडी आपली काढून ।
सावली डोक्या करुन । नाग गेला गुंगून ।। धृ ।।

भगवंताच्या लिलेला । अंत नाही करणीला ।
माता आली रानाला । जेवण घेवून लेकाला ।
प्रकार सारा पाहिला । लय भ्याली जीवाला ।
गाजावाजव ऐकला । नाग गेला वारुळाला ।
जाग करुन तान्ह्याला । जेवूं घालून बाळाला ।
गप आली घराला । शकून सांगे सर्वाला ।
कोण सगिना बाईला । जावून भेटे भटाला ।
भट बोलू लागला । भट सांगू लागला ।
जिवाई त्या बाईला । मल्हारीच्या आईला ।
पृथ्वी पती सृष्टीला । राजा होईल भूमीला ।
असे सांगता बाईला । आनंद झाला माईला ।
शकून चांगला जाणून । भोज त्याही राजान ।
लग्न दिले करुन । कन्या गौतमा देवून ।
पुढे काय दिवसाला । भाग आलं उदयाला ।
दुसऱ्याच्या दिवसाला । सतराशे तेवीस सालाला ।

रत्न आलं जन्माला । मल्हाररावच्या वंशाला ।
नांव त्याचे खंडोबा । कुळस्वामी दैवतबा ।
लहानपणा पासून । बाळ तेथे वाढून ।
बापासंगे राहून । युध्द कला शिकून ।
झाला बाळ प्रविण । घ्यावे तुम्ही ऐकून ।

खंडेराव बाळाला । दोन बहिणी मायेला ।
उदई नांव पहिलीला । सिता नांव दुसरीला ।
मल्हारराव युध्दाला । प्रविण होता गनिम्याला ।
बावन लढाया लढला । पेशव्याच्या वेळेला ।
मानव त्या कोटीला । रत्न येती जन्माला ।
पडत्या मराठी शाहीला । झेंडा त्यानं लावीला ।
अवघ्या जन्म भूमिला । लौकीक त्यानं मिळविला ।
हार हार बोला तुम्ही । महादेव ते बोला ।। धृ ।।

## २) कौन्यासूर दैत्य

– ओवीकार  कि.आ. कारंडे,
विटा ( सांगली )

सुंबराणं मांडलं । सुंबराणं मांडलं ।। धृ ।।
कृष्णा भिवर संगमाला । दैत्य एक मातला ।।
भोळ्या माझ्या सांभाला । कोडं त्याला पडलं ।।
दैत्य एवढा मारायला । काय एवढं करावं ।।
पोथी पानं काढलां । वाचून त्या पाहिलं ।।
दैता याच मरणं । लिंग देवाच्या हातात ।।
पत्रिका त्या लिव्हल्या । मानीवात धाडल्या ।।
शंकराच्या पत्रिका । भरा-या त्या मारत ।।
घोडगिरी डोंगराला । मुळच्या बाबा मठाला ।।
देवा आल्या पत्रिका । वाचून त्या पाहिल्या ।।
लिंग बंधु रायाला । सुरवतीच्या तान्याला ।।
मायवाच्या बंधुला । लिंगाकार हरीला ।। धृ ।।

००००००००

द्वापार ते युगाला । घोडगिरी डोंगराला ।।
पहिला मठ देवाचा । शिरढोण या गांवाला ।।
दुसरा मठ देवाचा । कौन्यूर या गांवाला ।।
तिसरा मठ दे बांधला । सिध्द माळींग रायाने ।।
याच मठावर हो । सेवा करतो देवाची ।।
द्वापार युग संपलं । कलियुग निघालं ।।
सिध्द माळींग रायानं । हलाजित गांवाला ।।

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

जित समाधी घेतली । देव मोकळा झाला ॥
बिरू बंधु रायाला । द्वापार ते युगाला ॥
तीन मठ नांदायला । लिंगाकार हारीला ॥ ध्रु ॥

००००००००

कलि याका युगांला । सिद्दरदेव धावला ॥
सु-याबा तो नल्टया । सैथा हिव-या बनाला ॥
आरेवाडी गांवाला । मठ त्याने बांधला ॥
बिरू बंधु रायाची । सेवा करूं लागला ॥ ध्रु ॥

००००००००

बिरू बंधु रायानं । मोत्या मंदील बांधला ॥
तुरा सोन्या खवला । तुरा ढाल देतुया ॥
भंडा-याचा ताटबा । बगल्ला लावलं ॥
नागड बंधा वेत । हातामधी धरला ॥
काशलींग महाराज । लिंगाकार हरी ॥
इंदरत्या सभेला । शंकराच्या क्वेरीला ॥
देव गेला चालून । पांचाया मुंजरं दिलं ॥
शंकराला बोलतो । काव देवा बोलक्लिं ॥

००००००००

बिरू बंधु राया हो । सुरवंतीचा बाळ हो ॥
कृष्णा भिवर संगमाला । देव तेव्हा आलाया ॥
कोन्यासूर दैत्य हो । देव लागला हुडकायला ॥

कौन्यासूर दैत्यानं । कंचाळात्या झाडात ।।
मुंडी त्यानं घातली । एक कान हातरला ।।
एक कान पांघरला । सहा महिन्या झोप ।।
देत्या झोप लागली । देवा दैत्या धावना ।।

०००००००००

कश्यपाचा मुलगा । कद्रूबाईचा मुलगा ।।
चंद्र आणि सूर्याचा । अग्नी वायवाचा ।।
नात्यायानं मुलगा । सात फडया भुजिंग ।।
दक्षायणी बाईगा । शंकराची राणी गा ।।
कश्यपया राजाला । चंद्र आणि सूर्याला ।।
सख्खी लागती मेव्हणी । नातं घ्यावं ध्यानी ।। धृ ।

०००००००००

सात फडया शेकानं । देवाला त्या आडवलं ।।
वगमान देवाचा । मग पुढे जावावं ।।
देवानं त्या ऐकलं । वग मान दिलाया ।।
द्वापार युग बुडलं । कलियुग निघालं ।।
कलियुगा मधीगा । कृष्णा नदी कांठाला ।।
नागठाणाचा मठ । मठ बाबा बांधीन ।।
पांच रोज नांदीन । नागठाणाचा बिल्वा ।।
दोघा नांव चालीलं । घ्यावं एक्वढं ऐकून ।। धृ ।

०००००००००००

देव बोलतो दैत्याला । कुठार बाबा मारायला ॥
दैत्याला हासु आल्या । देवा बोलू लागला ॥
वडाव गईंच्या लुटगा । काय मरतो म्हा ॥
सांग तो बा ऐकावं । बारा कोस पड्यालं ॥
सूर बाबा वडताना । बारा कोसा आंतिल ॥
झाडबाबा झुडपं । दगड आणि मातीगा ॥
गांव म्हन शिवगा । मानसं या जनावरं ॥
माझ्या बाबा पोटांत । पोटायात जात्याती ॥ धृ ॥

oooooooo

बावन निद्रा वाटनं । बाणा अडवा लावला ॥
दैत्यायाबा बाणा । वाटत्या गप्प केल्यांत ॥
दैत्य देवा बोलतो । बाण तुला का लागला ॥
देव दैत्या बोलतो । बाण कुठ सोडला ॥
खोटं कारं बोलतो । युध्द नीट खेळावं ॥
कोन्यासूर दैत्यानं । तीन बाण मारलं ॥
लिंगाकार हारीनं । वाटत्या गप केलं हो ॥ धृ ॥

ooooooooo

लिंगाकार हारीनं । बिरू बंधु रायानं ॥
दिव्य बाण काढला । दैत्याला तो मारला ॥
दैता मुंडी उडाली । सात कोसा पडली ॥
दुसरा बाण मारला । दैता धड उडविलं ॥
दैत्या याच्या घडाला । वाचा त्याला फुटली ॥

ooooooooo

मुंडी पडल्या जाग्याला । मुंडग नगर गांव ।।
धड पडल्या ठायाला । मठ तेव्हां बांधीनं ।।
पांच दिवस नांदीन । कौन्यूरचा बिरुबा ।।
तुला दैता म्हणातील । नांव दोघा चालेल ।। धृ ।।

oooooooo

दैत्य देवानं मारला । कैलासाला गेलाया ।।
शंकराला बोले तो । दैत्य आलो मारुनं ।।
देवा मागनं देवावं । सांगतोबा ऐकावं ।।
सेवकाची आवड । सेवक मला निमता ।।
तुझा देवा सेवक । शिवा मध्ये शिवगिनी ।।
देवामध्ये देवयानी । मानविात मनगिनी ।।
सेवक मला देवावा । मागणं हे ऐकावं ।। धृ ।।

ooooooooo

ओवी माझी संपली । दैता लागला शेवट ।।
बिरु बंधु रायानं । कौन्यासूर दैताला ।।
दैता याला मारुन । जग सुखी राखलं ।। धृ ।।

oooooooooo

## २) अवतार देवा धराया कारण
## आमुचीया जात उध्दरण्या

- ओवीकार किसन आपाराव कारंडे
विटा, सांगली.

सुंबरान मांडिलं । सुंबरान मांडिलं ॥ ध्रु ॥
सत युगी धनगर । वसाडीत राहाणार ॥
नाही ओळख देवाची । गत काय जन्माची ॥
लिंगकार या हारीला । बिरू बंधु रायाला ॥
अवतार हे धरायला । भाग पाडलं देवाला ॥
धनगराच्या भाकला । उभा राहीला हाकला ॥ ध्रु ॥

oooooooo

सत युगी बामन । भिक्षा मागण्या कारण ॥
दुसऱ्या गांवा चालला । ओढयाच्या काठाला ॥
महादेवाचे देऊळ । बामन बघतो न्हाऊन ॥
विचार तो चालविला । पुजा देवाची करण्याला ॥
सत युगी बामण । पुजा करण्या कारण ॥ ध्रु ॥

oooooooo

त्याच बाबा दिवसाला । ओढयाच्या काठाला ॥
सत युगी बामन । आला पुजा कारण ॥
धनगराची पुजा हो । बामणाने पाहिली ॥
राग आला बामणाला । कैसा भक्त भेटला ॥
देवा मार्ग दडला । भक्त तेव्हा बघायला ॥ ध्रु ॥

oooooooo

| | | | |
|---|---|---|---|
| दुपारच्या पाऱ्याला | । | मैंढ्या आल्या पाण्याला | ।। |
| नित्य नेमाप्रमाण | । | पुजा करण्या कारण | ।। |
| घोटी स्नान केलं हो | । | तोंडा पाणी घेतलं | ।। |
| तरवाडाची पतरीची | । | नागझारी पाण्याची | ।। |
| लई आवड देवाला | । | लिंगाकार हरिला | ।। धृ ।। |

००००००००

| | | | |
|---|---|---|---|
| देवा देऊळ कडाडलं | । | आवाज देवळा झाला | ।। |
| देवळ हादरू लागलं | । | भेग पडू लागली | ।। |
| सत युगी बामण | । | धनगराला सोडून | ।। |
| देवळा बाहेर पळाला | । | धनगराला बोलावला | ।। |
| धनगर त्यो बोलतो | । | देव माझा मरतो | ।। धृ ।। |

००००००००

| | | | |
|---|---|---|---|
| चतुर भुज हारी हो | । | धनगराचा कैवारी | ।। |
| प्रकार झालाया हो | । | भक्ती भावा भुकेला | ।। |
| अवतार हो दाखवला | । | धनगराच्या भाकेला | ।। |
| सुंबरान मांडीलं | । | सुंबरान मांडीलं | ।। धृ ।। |

००००००००





**Fig. 1 : Shepherd Community in India**

(This map is adopted from Report on a Project entitled "Seasonal Migration of Shepherd Community in Central Plateau Maharashtra", by Prof. Gharge, S.R.)





Fig. 2 : Distribution of Dhangar Castes primarily dependent on buffalo, cattle, sheep, weaving of wool and weaving of cotton.

his map is adopted from an article "The Ecological Basis of the eographical Distribution of the Dhangars : A Pastoral Caste luster of Maharashtra", by Malhotra, K.C. and Gadgil, Madhav) outh Asia Anthropologist, 1981, 2 (2) : 49-59, p. 54).





Fig. 3 : Distribution of Sheep Population densities in Maharashtra (Census, 1961).

(This map is adopted from an article "The Ecological Basis of the Geographical Distribution of the Dhangars : A Pastoral Caste - Cluster of Maharashtra" by Malhotra, K.L. and Gadgil, Madhav).

(Touth Asia Anthropologist, 1981, 2(2) : 49-59, p. 55).





Fig. 4 : Mendhe Dhangar in Maharashtra State.





Fig. 5 : Mendhe Dhangars in Kolhapur District.





Fig. 6 : Locations of Ghunaki and Pattankodoli villages in Hatkanangale Taluka.




Fig. 7 : Map of Pattankodoli village.